# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल: mercindia@merc.gov.in वेब-साईट www.mercindia.org.in/www.merc.gov.in

## जाहीर सूचना

**जाहिरात क्र. १५ /२०१४-१५**

**सन २०१४ च्या प्रकरण क्र. १०० अन्वये नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानांकरिता लागू असलेल्या व्यापक (जेनेरिक)वीज दराच्या आदेशाची मुदत, त्याच्या अटी आणि शर्तींसह, वाढविण्यासाठी आयोगाने स्वत:हून तयार केलेल्या प्रारुप आदेशावर सूचना/हरकती मागविण्याबाबत (सन २०१५ चे प्रकरण क्र. ३४)**

१. नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती विनियम, २०१० मधील तरतुदींनुसार, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, सन २०१४ च्या प्रकरण क्र. १०० अन्वये नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानासाठी व्यापक (जेनेरिक) वीज दराचा आदेश निर्गमित केला होता. सदर आदेशाची मुदत दि. ३१ जूलै, २०१५ पर्यंत वाढविण्यासाठी आयोगाने स्वत:हून प्रारुप आदेश तयार केला असून तो आयोगाच्या www.mercindia.org.in/www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

२. या प्रारुप वीज दराच्या आदेशावर आयोग, जनता, वितरण परवानाधारक आणि अन्य हितसंबंधितांकडून लेखी हरकती आणि सूचना मागवित असून या हरकती आणि सूचना ६ (१+५) प्रतींमध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे सचिव यांना, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५ या पत्त्यावर, व्यक्तिश: किंवा टपालाने किंवा (फॅक्स: ०२२-२२१६३९७६ ई-मेल: mercindia@mercindia.gov.in) द्वारा दि. १ एप्रिल, २०१५ पर्यंत मिळतील अशा रीतीने कृपया पाठविण्यात याव्यात.

३. १ एप्रिल, २०१५ रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेल्या सर्व सूचना आणि हरकती आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

सही /-

सचिव,
मविनिआ

मुंबई
दिनांक : ११ मार्च, २०१५